**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०
**E.Mail- pilcbnskr@gmail.com**

---

**प्रेसनोट** दिनांक:- २८/०४/२०१८

## घोटी परिसरातील अवैध गावठी दारू हातभट्टयांवर स्थानिक गुन्हे शाखेचे छापे

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांनी आदेशित केले प्रमाणे जिल्हयातील अवैध धंदयाचे समुळ उच्चाटन होणेसाठी अवैधरित्या मद्याची वाहतुक व विक्री करणारे, तसेच हातभट्टीची गावठी दारू तयार करणारे इसमांवर सत्वर कारवाई करण्यात येत आहे. त्यानुसार **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी स्थागुशाचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना अवैध धंदयांवर छापे टाकणेसाठी सुचना दिल्या आहे.

त्याप्रमाणे आज दिनांक २८/०४/२०१८ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी इगतपुरी तालुक्यातील घोटी परिसरत अतिदुर्गम भाग, डोंगर द-या, नदी नाले असलेल्या ठिकाणांवर रात्रभर पाळत ठेवुन धामणी शिवारातील द-याचे डोंगराचे पायथ्याशी अवैधरित्या सुरू असलेल्या **०२ गावठी दारू हातभट्टयांवर पहाटेचे सुमारास छापे टाकले**. सदर छाप्यात हातभट्टी गावठी दारू तयार करण्यासाठी लागणारे **८२०० लिटर रसायन, प्लॅस्टिकचे ४१ ड्रम, ५० लिटर तयार गावठी दारू** व साहित्य साधने असा एकुण **०४ लाख २४ हजार ६०० रूपये किं.चा मुद्देमाल** हस्तगत करण्यात आला असुन इसम नामे **१) एकनाथ भाउ भले**, रा. धामणी बोरीचीवाडी, ता.इगतपुरी, **२) सागर गंगाराम पारधी**, रा. बिटुर्ली,ता. इगतपुरी, **३) भाउसाहेब काळु मेंगाळ**, रा. बोरीचीवाडी, ता.इगतपुरी यांचेविरूध्द **घोटी पोलीस ठाणेस मुंबई दारूबंदी कायद्यान्वये ०२ गुन्हे दाखल** करण्यात आले आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **मा. पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** व अपर पोलीस अधीक्षक **श्री.विशाल गायकवाड सो.** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे**, सपोउनि नवनाथ गुरूळे, पोहवा राजु दिवटे, शिवाजी जुंदरे, बंडु ठाकरे, पोकॉ संदिप हांडगे, लहु भावनाथ, सचिन पिंगळ अशांचे पथकाने सदर कारवाई केली आहे. जिल्हयातील अवैध धंदयांचे समुळ उच्चाटन होणेसाठी आगामी काळात अवैध धंदयांवर सतत कारवाई सुरू राहणार आहे.